# ८. अर्थव्यवस्था आणि व्यवसाय

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही त्या देशातील व्यवसाय, त्यांचे प्रकार आणि विकास यावर अवलंबून असते.

**भारत आणि ब्राझील मधील आर्थिक व्यवसाय :**

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ब्राझील पेक्षा अधिक आहे. ब्राझील खाणकाम, शेती, वस्तूनिर्माण उद्योगात, सेवा व्यवसायात अग्रेसर आहे.

भारतात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. भारत व ब्राझीलची अर्थव्यवस्था मिश्र स्वरुपाची असून विकसनशील आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ब्राझीलच्या तुलनेत जास्त आहे पण दरडोई उत्पन्न ब्राझील पेक्षा कमी आहे.

अमेरिकेची संयुकत संस्थाने हा विकसित देश आहे. या देशांमधील लोकसंख्या जास्त असली तरी ही भारतापेक्षा कमी आहे तसेच ती साक्षर आहे. या देशांकडे अनेक पेटंटस, आधुनिक तंत्रज्ञान, यांत्रिक सामर्थ्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाचा बाबतीत हा देश ब्राझील व भारतापेक्षा खूप पुढे आहे.

भारत ब्राझील हे विकसनशील आहे. भारताची लोकसंख्या जास्त असल्याने भारतातील दरडोई उत्पन्न ब्राझीलच्या तुलनेत कमी आहे.

शेती : ब्राझीलची उच्चभूमी व किनारी प्रदेशात शेती हा व्यवसाय केला जातो. भात व मका ही प्रमुख अन्नधान्याची पिके आहेत. कॉफी, कोको, सोयाबीन, ऊस ही नगदी पिके घेतात. कॉफी सोयाबीन यांची निर्यात होते. केळी, अन्न, संत्री ही फळे घेतात.

गवताळ प्रदेशात शेळया, मेंढ्या, गाई पाळल्या गेल्याने मांसोत्पादन, दुग्धोपादन हे व्यवसाय चालतात.

खाणकाम - ब्राझीलचा पूर्व भाग लोहखनिज, मॅगनीज, निकेल, तांबे, बॉक्साईट इ. खनिजांनी संपन्न आहे ; पण खाणकाम व्यवसायाच्या विकासावर मर्यादा आल्या आहेत कारण तेथील दुर्गमता, घनदाट अरण्ये, सुप्त खानिज साठ्यांसंबंधीचे अज्ञान.

मासेमारी - ब्राझील देशाला सुमारे ७४०० कि.मी लांबीचा सागरीकिनारा लाभला आहे. थंड व उष्ण प्रवाहांचा संगम तेथे झाला आहे. द. अटलांटिक किनाऱ्यालगत मासेमारीचे उत्कृष्ट क्षेत्र लाभले आहे. स्वोई, कोळंबी, लॉनस्टार, सार्डिन हे मासे सापडतात. घनदाट वने व नदयांच्या पाण्याचा वेग यामुळे गोडया पाण्यातील मासेमारीचा विकास झालेला नाही.

भारतातील शेती : भारतात शेतीचे उत्पादन जास्त आहे. शेती उत्पादनातील मनुष्यबळही जास्त आहे. भारतातील विस्तीर्ण मैदाने, सुपीक मृदा, अनुकूल हवामान इ. मुळे ६०% भाग लागवडीखाली असतो.

भात, गहू, ज्वारी, बाजरी, मका ही खाद्यान्न पिके घेतली जातात. चहा, कॉफी, कापूस, रबर, ताग ही नगदी पिके घेतात. फळे, मसाल्याचे पदार्थ, भाजीपाला पिकवला जातो.

**मासेमारी :** खाऱ्या पाण्यातील, गोड्या पाण्यातील मासेमारीत भारत अग्रणी आहे. आहारासाठी, रोजगार निर्मिती, परकीय चलन मिळवण्यासाठी मत्स्य व्यवसायाचा उपयोग होतो.

भारताला ७५०० कि.मी सागरी किनारा लाभला आहे. किनाऱ्यालगत मासेमारीकेली जाते. वशी, बांगडा, बोंबील, सुरमई, पापलेट, झिंगे इ. मासे अरबी समुद्रात सापडतात. बंगालच्या उपसागरात शेवंडे, लबीचकई , रावस इ. सापडतात. नद्या, कालवे, जलाशय येथे गोड्या पाण्यात मत्स्यपालन केले जाते.

**खाणकाम :** छोटा नागपूरचे पठार खनिजांचे भांडार आहे. पूर्व महाराष्ट्र, छत्तीसगढ मधील कोरबा भागात कोळशाच्या खाणी आहेत. आसामात दिग्बोई, महाराष्ट्राजवळील अरबीसमुद्रातील मुंबई हाय, गुजरात मधील कलोल, कोयाली येथे खनिज तेलाच्या विहिरी आहेत. राज्यस्थानमध्ये संगमरवर, आंध्रमध्ये कडाप्पा येथे दगडाच्या खाणी आहेत.

**ब्राझीलमधील उद्योग :** लोह, पोलाद, वाहनजोडणी, खनिज तेल प्रक्रिया, रासायनिक उत्पादन, सिमेंट निर्मिती हे येथील उद्योग आहेत.

साखर, सुती कापड, रेशीम, लोकर उद्योग, खाद्यान्न प्रक्रिया इ. चा खूप विकास झाला आहे.

**भारतातील उद्योग :** भारतात कच्च्या मालाची उपलब्धता, ऊर्जा साधने, आर्थिक साधने, मागणी इ. घटकांमुळे उद्योगाचे असमान वितरण झाले आहे.

झारखंड, ओडिसा, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, राज्यस्थान, कर्नाटक, तमिळनाडू या राज्यात धातू खनिजाचे साठे आहेत म्हणून भारतीय व्दीपकल्पाच्या ईशान्य भागात धातू निर्मित्तीचे उद्योग आहेत.

तेथे लोह, पोलाद उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. तेथे सापडणारा कोळसा, लोहखनिज, दामोदर-महानदी खोऱ्यातील जलविद्युत व अनेक औष्णिक विद्युत केंद्राकडून मिळणारी अखंडित स्वस्त वीज हे तेथील धातू उद्योगाच्या वाढीस कारणीभूत आहेत.

राजस्थानात तांबे, शिसे, जस्त, कर्नाटकात लोह, पोलाद, मँगनीज, ॲल्युमिनियम, तामिळनाडूत ॲल्युमिनियम हे धातू उद्योग आहेत. महाराष्ट्र व उत्तरप्रदेश येथे साखर उद्योग, पश्चिम बंगाल मध्ये ताग उद्योग विकसित झाले आहे कारण तेथे कच्चा माल ऊस, ताग मिळते. वन्य प्रदेशाजवळ वनोत्पादनवर आधारित उद्योग आहेत. उदा. कागद, प्लायवुड, आगपेट्या, राळ, लाख, लाकडी वस्तूंची निर्मिती. कोकण, केरळच्या किनारी प्रदेशात काथ्या, फळ प्रक्रिया, मासे प्रक्रिया करणारे उद्योग आहेत.

खनिज तेल असलेल्या प्रदेशात तेल शुद्धीकरण केंद्रे आहेत. उदा. कोयली, दिग्बोई, नूनमती, बानगाई गाव, मथुरा व रौबी, गुजरात, राजस्थान, तामिळनाडू येथे मिठाचे उत्पादन होते.

**व्यापार - ब्राझील :** लोहखनिज, कॉफी, कोको, कापूस, साखर, संत्री, केळी इत्यादीची निर्यात केली जाते. यंत्रसामग्री, रासायनिक उत्पादने, खते, गहू, वाहने, खनिज तेल, वंगण इत्यादींची आयात केली जाते.

ब्राझीलचा जर्मनी, अमेरिका, संयुक्त संस्थाने, कॅनडा, इटली, अर्जेंटिना, सौदी अरेबिया, भारत या देशांशी व्यापार चालतो.

**व्यापार भारत :** चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, कमावलेले कातडे, कातडी वस्तू, लोहखनिज, कापूस, रेशमी कापड, आंबे, इत्यादी ची निर्यात करतो. खनिज तेल, यंत्र सामग्री, मोती, मौल्यवान खडे, सोने, चांदी, कागद, औषधे आयात करतो. युनायटेड किंगडम, अमेरिका संयुक्त संस्थाने, जर्मनी, जपान, चीन, रशिया हे भारताचे व्यापारी भागीदार आहेत.